20 APR 2026
पुढारी


# एमबीए, बीएस्सीच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षा सुरू आहेत. बी.व्होक., बी.कॉम., बीए., बीबीए., बीएस्सी, एमबीए, एमए, बीएड, बॅचलर ऑफ लॉ थ्री ईयर, एमआरएस आदी ६१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील १०२ केंद्रांवर परीक्षा झाल्या. परीक्षेला ५ हजार ४०६ विद्यार्थी उपस्थित होते.

20 APR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाचे दर्शन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुड (White-bellied Sea Eagle) या भव्य पक्ष्याच्या जोडीचे दर्शन घडल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही जोडी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असून त्यामुळे विद्यापीठ परिसरातील सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरणावर शिक्कामोर्तब झाले आहे.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षीनिरीक्षक महेंद्र गायकवाड यांना फेब्रुवारी २०२६मध्ये सर्वप्रथम भाषा भवन तलाव परिसरात या जोडीचे दर्शन घडले. तेव्हापासून त्यांचे येथे नियमित वास्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी डॉ. गायकवाड यांनी केलेल्या संशोधनानुसार, विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची आढळ नोंद झालेली आहे. आता या पक्ष्याच्या दर्शनाने त्यामध्ये महत्त्वाची नोंद समाविष्ट झाली आहे.

डॉ. गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड हा प्रामुख्याने समुद्रकिनारी आढळणारा पक्षी आहे. मात्र, सुरक्षित वातावरण आणि मुबलक खाद्यसंपन्नता असलेल्या अंतर्गत भूभागातही तो स्थलांतर करतो. सध्या विद्यापीठ परिसरात नर व मादी अशी जोडी आढळून आली असून, जोडीने उपस्थिती असल्यामुळे त्यांच्या प्रजोत्पादनाचा हेतू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखील, त्यांनी अद्याप या परिसरात घरटे बांधल्याचे आढळलेले नाही. त्यामुळे त्याविषयी ठोस सांगता येणार नाही.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील जलाशयांची पातळी कमी झाल्यामुळे मासे व इतर जलचर सहज उपलब्ध होत असल्याने खाद्यसंपन्नतेमुळे हे पक्षी येथे थांबले असावेत, असा अंदाज डॉ. गायकवाड यांनी व्यक्त केला. याशिवाय, समुद्रकिनाऱ्यांवरील वाढते पर्यटन प्रकल्प, बोटिंग आणि किनारपट्टीवरील प्रदूषण हीदेखील त्यांच्या स्थलांतरामागील कारणे असू शकतात, असे ते म्हणाले.

पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाचे शास्त्रीय नाव हॅलिएटस ल्युकोगॅस्टर आहे. हा पक्षी आकाराने मोठा असून मादी साधारणपणे नरापेक्षा मोठी असते. याची लांबी साधारण ७० ते ९० सेंमी दरम्यान असते, तर पंख पसरल्यावर त्यांची रुंदी सुमारे १.८ ते २.२ मीटरपर्यंत पोहोचते. पंख मिटल्यावर त्याचा आकार भरीव व मजबूत दिसतो. या गरुडाचे सर्वांत ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे शुभ्र डोके, मान, छाती आणि पोट. त्याची पाठ व पंख राखाडी रंगाचे असतात. शेपटी लहान व पूर्णपणे पांढरी असते. चोच मोठी, मजबूत व वाकडी असून ती करड्या-निळसर रंगाची असते. त्याची दृष्टी तीक्ष्ण असून शिकार पकडण्यासाठी त्याचे पाय व नखे अत्यंत शक्तिशाली असतात. तो प्रामुख्याने मासे, जलचर, लहान सस्तन प्राणी तसेच प्रसंगी मृत प्राण्यांवरही उपजीविका करतो. जलाशयांच्या आसपास उंच झाडांवर बसून गतीने झेप घेऊन शिकार टिपतो.

हा पक्षी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असून त्याला सर्वोच्च संरक्षण प्राप्त आहे. या श्रेणीत समाविष्ट पक्ष्यांची शिकार किंवा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा असून, त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे, अशी माहितीही डॉ. गायकवाड यांनी दिली.

20 APR 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कसबा बावडा शिवमय

**कसबा बावडा : प्रतिनिधी**

पारंपरिक शिवजयंती उत्सवानिमित्त कसबा बावड्यातील वातावरण शिवमय झाले होते. शिवचरित्रावरील पोवाड्यांनी परिसर दुमदुमून गेला होता. माळ गल्ली येथील विजय स्वतंत्र तरुण मंडळाच्या वतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते. सूर्योदय हिंदवी स्वराज्याचा, सोहळा शिवराज्याभिषेकाचा हा सजीव देखावा, तसेच सांगलीचे विसावा लेझीम पथक आणि श्रीराम गुरुकुल मर्दानी आखाडा हे मिरवणुकीचे खास आकर्षण होते.

शनिवारी (दि. १८) मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतीचे आगमन सायंकाळी सात वाजता झाले. त्यानंतर दौलत देसाई, नगरसेवक राजेश लाटकर, रोहन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवप्रतिमेस अभिषेक करण्यात आला. रविवारी (दि. १९) सकाळी शिव जन्मकाळ सोहळा जि. प. सदस्या सोनाली राहुल सावंत, नगरसेविका रूपाली पोवार यांच्या उपस्थितीत झाला. संयुक्त कसबा बावडा यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज भगवा चौक येथे शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. फ्रेंडस् पॉवरच्या वतीने शिवप्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. याशिवाय छत्रपती शिवाजीराजे तरुण मंडळ, पाटील गल्ली, भारत वीर मित्र मंडळ, चौगले गल्ली, संघर्ष मित्र मंडळ, आंबे गल्ली, जय शिवराय तरुण मंडळ, ठोंबरे गल्लीसह कसबा बावडा, लाईन बाजार परिसरातील मंडळांनी शिवप्रतिमेचे पूजन केले होते.



**लाईन बाजार येथील शहाजी तरुण मंडळाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरची ८४ फूट लांबीची भव्य प्रतिकृती तयार केली आहे . या प्रतिकृतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा लक्ष वेधून घेत होता .**

20 APR 2026



# शिवाजी विद्यापीठाचा एक्सलॉजिया कंपनीसमवेत सामंजस्य करार



[illegible]

20 APR 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# बावड्यात शिवजयंतीनिमित्त मिरवणूक उत्साहात

## मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन; मिरवणुकीत 'शिवराज्याभिषेक' सजीव देखावा ठरला आकर्षण

**कसबा बावडा : पुढारी वृत्तसेवा**

येथे पारंपरिक शिवजयंतीनिमित्त रविवारी उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

शनिवार, दि. १८ रोजी विजय स्वतंत्र तरुण मंडळातर्फे मान्यवरांच्या उपस्थितीत शिवप्रतिमेला अभिषेक घालण्यात आला. दौलत देसाई यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. रविवारी सकाळी ११.३० वा. शिवजन्मकाळ सोहळा सोनाली सावंत यांच्या उपस्थितीत झाला.




**कसबा बावडा : १) येथील विजय स्वतंत्र तरुण मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सवानिमित्त रविवारी शिवप्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. २) शहाजी तरुण मंडळ चार नंबर फाटक यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठाची तब्बल ८६ फूट उंचीची प्रतिकृती साकारली आहे. (छाया : पवन मोहिते)**

यावेळी नगरसेविका रूपाली पोवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळी ६ वा. शिवप्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचे उद्घाटन आमदार राजेश क्षीरसागर, कौस्तुभ गावडे आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. यामध्ये हजारो कार्यकर्त्यांनी साऊंड सिस्टीमच्या तालावर नृत्याचा ठेका धरला होता. मिरवणुकीत 'सूर्योदय हिंदवी स्वराज्याचा, सोहळा शिवराज्याभिषेकाचा' हा सजीव देखावा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. सांगलीची विसावा लेझीम आणि श्रीराम गुरुकुल मर्दानी आखाडा यांनी मिरवणुकीत शिवप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत सामाजिक, इतिहासातील काही प्रसंग, पर्यावरण आदी विषयी सजीव देखावे सादर करण्यात आले.

दरम्यान, फ्रेंडस् पॉवर, अष्टविनायक कॉलनी शुगर मिल कॉर्नर यांनी शनिवारी शिव-शंभूंच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढली. यामध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांसह महिला सहभागी झाल्या होत्या.

शिवजयंतीनिमित्त कसबा बावडा परिसरात बहुतांश मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन केले. दिवसभर शाहिरी पोवाड्यांनी इतिहास जागवला. चार नंबर फाटक येथील शहाजी तरुण मंडळ शिवजयंती उत्सव २०२६ निमित्त शिवाजी विद्यापीठाची तब्बल ८६ फूट उंचीची भव्य प्रतिकृती साकारली आहे. ही प्रतिकृती सर्वांचे आकर्षण ठरली आहे.

### चित्राचे कौतुक

संयुक्त कसबा बावडा शिवजयंती उत्सवनिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कलेला वाव अन् प्रोत्साहन देण्यासाठी राबवलेल्या या उपक्रमात येथील चित्रकार जे. डी. मोरे यांचे नातू कृष्णा मोरे याने कलायोगी जी. कांबळे यांनी रेखाटलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चित्रासारखे हुबेहूब चित्र रेखाटले. या संदर्भात समाज माध्यमांवर या चित्राचे कौतुक करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
20 APR 2026

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# शिवाजी विद्यापीठाच्या 'सैफ' केंद्राच्या कामगिरीचा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाकडून गौरव

## समाजमाध्यमांवरून लघुचित्रफीत केली प्रसारित

**कोल्हापूर, : (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटी सेंटर- सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सीएफसी सैफ) या विभागाच्या दर्जेदार कामगिरीची दखल घेतली आहे. विद्यापीठाच्या या केंद्रात उपलब्ध असलेली अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधा यांची माहिती देणारी लघुचित्रफीत केंद्रीय विभागाने त्यांच्या समाजमाध्यमांच्या सर्व मंचावरून प्रदर्शित केली आहे. अशा प्रकारे केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव होण्याचा बहुमान मिळविणारे शिवाजी विद्यापीठाचे ह देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने आपल्या एक्स, लिंक्डइन आणि फेसबुक या समाजमाध्यमांच्या मंचांवरून शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्राची माहिती देणारी तीन मिनिटांची लघुचित्रफीत प्रदर्शित केली आहे. लघुचित्रफीतीसमवेत लिहीलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाचे पाठबळ लाभलेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज () हे केंद्र संपूर्ण भारतातील संशोधक, शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना अत्याधुनिक विश्लेषणात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवत आहे. मंत्रालयाच्या सैफ कार्यक्रमांतर्गत २०१४ मध्ये स्थापन झालेले हे केंद्र, अतिप्रगत उपकरणांच्या साहाय्याने अचूक विश्लेषण आणि नाविन्यपूर्णतेला चालना देऊन वैज्ञानिक संशोधनाला यशस्वीपणे बळकटी देत आहे.'

या पोस्टमध्ये मंत्रालयाने खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) डॉ. जितेंद्र सिंह, सचिव अभय करंदीकर यांच्यासह केंद्रीय जैवतंत्रज्ञान मंत्रालय, भूविज्ञान मंत्रालय, सीएसआयआर-इंडिया यांना टॅग केले आहे.

या केंद्राचे संचालक डॉ. ज्योतीप्रकाश यादव यांनी मंत्रालयाकडून झालेल्या गौरवाबद्दल समाधान व्यक्त केले. केंद्राच्या वाटचालीविषयी सांगताना ते म्हणाले, विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्रामध्ये एकूण सोळा विविध अतिउच्च दर्जाची अत्याधुनिक वैज्ञानिक संश्लेषक उपकरणे आहेत. त्यावर भारतातील विविध विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योगांमधील संशोधकही आपल्या संशोधनाचे नमुने तपासणीसाठी पाठवित असतात. मागील पाच वर्षांचा आढावा घेत असता, सन २०२०-२१मध्ये देशभरातून २४०० नमुने तपासणीसाठी आले होते. त्या माध्यमातून दोन लाख ४४ हजार रुपये इतके उत्पन्न विद्यापीठास मिळाले होते. आता २०२५-२६मध्ये देशभरातील संशोधन संस्थांकडून तपासणीसाठी येणाऱ्या नमुन्यांची संख्या आठ हजारांच्या घरात गेली असून उत्पन्नही ५२ लाख रुपयांपर्यंत वाढले आहे. त्याखेरीज केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम या माध्यमातून दरवर्षी साधारणतः १२०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरण हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येते. केंद्राच्या या सर्व विज्ञानाभिमुख कामगिरीची केंद्रीय मंत्रालयाने दखल घेतली, याचा मोठा आनंद वाटत आहे. यापुढील काळातही येथील उपकरणांची संख्या वाढविण्यात येऊन आणखी दर्जेदार व आधुनिक विश्लेषण सुविधा संशोधकांना उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळेच हा सन्मान केंद्राला लाभला आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने समाजमाध्यमांवरून प्रसारित केलेल्या लघुचित्रफीतींच्या लिंक पुढीलप्रमाणे-

https://x.com/IndiaDST/status/2044997863554646129https://www.linkedin.com/posts/indiadst_saif-ugcPost-7450765283746820096-xdk4?utm_source=share&utm_medium=member_desktop&rcm=ACoAAENLVvkBSDJcfw-kYkvD27JZxQSEgqi9udwhttps://fb.watch/Gxs-uCul9M/

2 0 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'सैफ' केंद्राच्या कामगिरीचा गौरव

## केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून दखल : समाजमाध्यमांवरुन लघुचित्रफित प्रसारित

- केंद्र देशातील संशोधक, शैक्षणिक संस्था, उद्योगांना पुरवतेय अत्याधुनिक विश्लेषणात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवा
- केंद्रात १६ विविध अतिउच्च दर्जाची अत्याधुनिक वैज्ञानिक संश्लेषक उपकरणे
- एक्स, लिंक्डइन आणि फेसबुकचा समावेश



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्रात उपलब्ध अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणे.

### विद्यापीठास भरघोस उत्पन्न

डॉ. यादव म्हणाले, मागील पाच वर्षांचा आढावा घेत असता, सन २०२०-२१ मध्ये देशभरातून २४०० नमुने तपासणीसाठी आले होते. त्या माध्यमातून दोन लाख ४४ हजार रुपये इतके उत्पन्न विद्यापीठास मिळाले होते. आता २०२५-२६ मध्ये देशभरातील संशोधन संस्थांकडून तपासणीसाठी येणाऱ्या नमुन्यांची संख्या आठ हजारांच्या घरात गेली असून उत्पन्नही ५२ लाख रुपयांपर्यंत वाढले आहे.

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटी सेंटर-सोफिस्टिकेटे अॅन्ड अॅनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सीएफसी– सैफ) या विभागाच्या दर्जेदार कामगिरीची दखल घेतली आहे. विद्यापीठाच्या या केंद्रात उपलब्ध असलेली अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधा यांची माहिती देणारी लघुचित्रफीत केंद्रीय विभागाने त्यांच्या समाजमाध्यमांच्या सर्व मंचावरून प्रदर्शित केली आहे. अशाप्रकारे केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव होण्याचा बहुमान मिळविणारे शिवाजी विद्यापीठाचे हे देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने आपल्या एक्स, लिंक्डइन आणि फेसबुक या समाजमाध्यमांच्या मंचांवरून शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्राची माहिती देणारी तीन मिनिटांची लघुचित्रफीत प्रदर्शित केली. यासमवेत म्हटले, 'केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाचे पाठबळ लाभलेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील सोफिस्टिकेटेड अॅनालिटीकल इन्स्टुमेंट फॅसिलिटीज' हे केंद्र संपूर्ण भारतातील संशोधक, शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना अत्याधुनिक विश्लेषणात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवत आहे. मंत्रालयाच्या सैफ कार्यक्रमांतर्गत २०१४ मध्ये स्थापन झालेले हे केंद्र, अतिप्रगत उपकरणांच्या सहाय्याने अचूक विश्लेषण आणि नाविन्यपूर्णतेला चालना देऊन वैज्ञानिक संशोधनाला यशस्वीपणे बळकटी देत आहे.'

या पोस्टमध्ये मंत्रालयाने खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) डॉ. जितेंद्र सिंह, सचिव अभय करंदीकर यांच्यासह केंद्रीय जैवतंत्रज्ञान मंत्रालय, भूविज्ञान मंत्रालय, सीएसआयआर-इंडिया यांना टॅग केले आहे.

या केंद्राचे संचालक डॉ. ज्योतीप्रकाश यादव यांनी मंत्रालयाकडून झालेल्या गौरवाबद्दल समाधान व्यक्त केले. केंद्राच्या वाटचालीविषयी सांगताना ते म्हणाले, विद्यापीठाच्या सीएफसी-सैफ केंद्रामध्ये एकूण सोळा विविध अतिउच्च दर्जाची अत्याधुनिक वैज्ञानिक संश्लेषक उपकरणे आहेत. त्यावर भारतातील विविध विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योगांमधील संशोधकही आपल्या संशोधनाचे नमुने तपासणीसाठी पाठवित असतात. त्याखेरीज केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम या माध्यमातून दरवर्षी साधारणतः १२०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरण हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येते. केंद्राच्या या सर्व विज्ञानाभिमुख कामगिरीची केंद्रीय मंत्रालयाने दखल घेतली, याचा आनंद आहे. पुढील काळात उपकरणांची संख्या वाढविण्यात येऊन आणखी दर्जेदार व आधुनिक विश्लेषण सुविधा संशोधकांना उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळेच हा सन्मान केंद्राला लाभला आहे, अशी भावना डॉ. यादव यांनी व्यक्त केली.

20 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'सैफ' केंद्राच्या नमुना तपासणीतून ५२ लाखांचे उत्पन्न

## कामगिरीचा केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटी सेंटर-सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सीएफसी-सैफ) या विभागाकडे २०२५-२६ मध्ये देशभरातून तपासण्यासाठी आलेल्या नमुन्यांची संख्या आठ हजारांच्या घरात असून, उत्पन्न ५२ लाख रुपयांपर्यंत वाढले आहे. या कामगिरीची केंद्रीय मंत्रालयाने दखल घेतली आहे. अशा प्रकारे केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव होण्याचा बहुमान मिळविणारे हे देशातील पहिलेच विद्यापीठ आहे.

शिवाजी विद्यापीठ येथील सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज' (सैफ) हे केंद्र देशातील संशोधक, शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना अत्याधुनिक विश्लेषणात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवत आहे. २०१४ मध्ये स्थापन झालेले हे केंद्र, अतिप्रगत उपकरणांच्या साहाय्याने अचूक विश्लेषण आणि नावीन्यपूर्णतेला चालना देऊन वैज्ञानिक संशोधनाला बळकटी देत आहे. याची दखल घेत मंत्रालयाने विद्यापीठाच्या या केंद्रात उपलब्ध अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधा यांची माहिती देणारी लघुचित्रफीत समाजमाध्यमांच्या सर्व मंचावरून प्रदर्शित केली आहे.

संचालक डॉ. ज्योतीप्रकाश यादव म्हणाले, सैफ केंद्राकडे २०२०-२१मध्ये देशभरातून २४०० नमुने तपासणीसाठी आले. त्या माध्यमातून दोन लाख ४४ हजार रुपये इतके उत्पन्न विद्यापीठास मिळाले होते. शिवाय प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून दरवर्षी १२०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरण हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येते. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे सहकार्य लाभले आहे.